# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/09/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत १२ कि. मी अंतरावरील मौजा मेंढला येथे दिनांक १४/०९/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विकास तुकाराम जेवने, वय २८ वर्ष, रा. मेंढला ता. नरखेड व आरोपी नामे– रंजित वाडबुधे रा. मेंढला ता. नरखेड हे एकाच गावात राहात असुन फिर्यादी हा आरोपी याला पेट्रोल मागण्या करीता त्याच्या दुकानात गेला असता आरोपी याने पेट्रोल नाही आहे असे म्हणुन फिर्यादी सोबत झगडा भांडण करून बाजुला असलेली काडी हातात घेवुन फिर्यादीच्या डाव्या पायाच्या टोंगळयाच्या खाली मारून जखमी केले व शिवीगाळी करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रकाश जावरकर, मो. क्र. ९८६०४९२२६८ हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. रामटेक :– दिनांक १४/०९/२०२३ चे १३.३० वा. ते १४.०० वा. दरम्यान **आरोपी नामे– १) गोलु उर्फ अंशुल नरेन्द्र सहारे** यांचे विरूध्द कोर्टात एफआयआर का दाखल केली म्हणुन फिर्यादीचे घरासमोर जावुन शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली व झाडाच्या कुंडया फोडल्या व आपटल्या तसेच आरोपी क्र. २) नरेन्द्र लक्ष्मण सहारे ३) ०२ महिला आरोपी सर्व रा. काचुरवाही यांनी फिर्यादीला लाथ बुक्यांनी मारहाण केली तसेच कपडे फाडले तसेच फिर्यादीची आई हीला सुद्धा अश्लील शिवीगाळ करून तिला लज्जा येईल अशी वर्तणुक करून कोर्टात केस मागे घ्यायला लाव नाहीतर बरे वाईट होईल असे बोलले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, २९४, ३२३, ३४ भादंवि. गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशि अर्पीत पशिने मो. नं. ९६६५७६२८१८ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कुही:**– दिनांक १३/०९/२०२३ चे २०.०० वा. ते आजपावेतो पो.स्टे. कुही हद्यीत फीर्यादी हयाची अल्पवयीन मुलगी ही आपल्या कुटुंबासह घरी झोपी गेली त्यानंतर दिनांक १४/०९/२०२३ रोजी सकाळी ५/०० वाजता फिर्यादी हे उठले असता तेव्हा फीर्यादीची मुलगी ही घरी दिसुन आली नाही तिचा गावातील ईकडेतिकडे, नातेवाईकांकडे फोन करून विचारले असता आमच्याकडे आली नाही असे सांगितले. फिर्यादीच्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. हरीहर सोनकुसरे मो. नं. हे ९०२१५४२९१८ करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील प्रसाद कॉलनी बोरी येथे दिनांक १३/०९/२०२३ चे १७.३० वा. ते दिनांक १४/०९/२०२३ चे १०.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– जितेन्द्र पंचू प्रधान, वय ४९ वर्षे, रा. क्वार्टर नं. बी/२९० सेक्टर नं. १६ राउरकिला कचरू सुंदरगढ ओरीसा ह. मु. c/o प्रसाद कॉलनी बोरी यांचे म्युच्युअल फंड ॲक्टीव्हेट करण्याकरीता आरोपी नामे– १) राकेश शर्मा नावाच्या व्यक्तीने २) विक्रम राठोड यांनी hope to desk नावाचे ॲप्स डाउनलोड करण्याचे सांगितल्याने फिर्यादीने ॲप्स डाउनलोड केले परंतु फिर्यादीचे म्युच्युअल फंड ॲक्टीव्हेट झाले नाही. फिर्यादीचे SBI अकाउंट मधुन ४,४९,२८४ /– रू. चे फेक ट्रान्झॅक्शन व्दारे दुसऱ्या अकाउंट मध्ये ट्रान्सफर करून ऑनलाईन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ४२० भादंवि ६६(C), ६६ (ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक पाटील मो. नं. ८९९९९४१७०९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**